# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०५/०९/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा तिष्टी बु येथे दिनांक ०४/०९/२०२२ चे ०२. ३७ वा. ते ०३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– मनिष भानुदासजी बोबडे, वय ४० वर्ष, रा.तिष्टी बु, त. कळमेश्वर यांचे स्वताचे घरात असलेले वैष्णवी ॲाग्रो एजन्सी चे दुकानाचे कुलुप अज्ञात चार आरोपीतांनी तोडुन आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानातील ड्राव्हरमध्ये ठेवलेले नगदी १०,०००/–रु., दोन चांदीचे सिक्के किमती १,०००/–रु., टिव्हीचा कन्वटर किमती ६,००/–रु. असा एकुण कि. ११,६००/–रु. चा मुद्देमाल तसेच सौ वैशाली संजय माहुरकर वय ३९ वर्ष रा. तिष्टी बु हिचे राहते घराचे कुलुप अज्ञात आरोपीने तोडुन आत प्रवेश करून आलमारीत ठेवलेले नगदी ९,०००/–रु. व चांदीचे पैजन किमती ४,०००/–रु. असा एकुण २४,६००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेट पोउपनि कामठे मो नं ९९२३२१०३४४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत रहाडी ता. मौदा येथे दिनांक ३१/०८/२०२२ चे १७.०० वा. ते ०१/०९/२०२२ चे ०८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– रामचंद्र लक्ष्मण शेंबे, वय ४२ वर्ष, रा. रहाडी ता. मौदा यांनी आपली राज कंपनीची नविन ट्रॉली ही नागपूर येथून विकत घेतली होती व ती ट्रॉली शेताच्या कामा करीता उपयोग करित होते. टोने यांच्या घरासमोर खाली जागेत लेआउट वर ट्रॉली ठेवत होते. दि ०१/०९/२२ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी हे राहाडी येथील टोने यांच्या घरासमोर खाली जागेत लेआउट वर गेले व त्यांनी पाहिले असता राज कंपनीची नविन ट्रॉली कि. ३०,००० /–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कुथे मो.नं. ९७६४००७७२० हे करीत आहे.

**३) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत नंदीखेडा वार्ड क्र. ३, ता. कळमेश्वर येथे फिर्यादी नामे– खेमराज बेलीराम नागदवने वय ४६ वर्ष, रा. नांदीखेडा यांची पत्नी घरी लागुन असलेले किराणा दुकान चालवित असुन दिनांक ०३/०९/२०२२ रोजी रात्री ०९.०० वा. दरम्यान दिवसभर विक्री केलेले पैसे दुकानात ठेवले व झोपले. त्यानंतर दिनांक ०४/०९/२०२२ चे ०५.०० वा. सुमारास घराशेजारी राहणार रमेश भोयर यांनी आवाज दिला असता दुकानाचे अर्धवट शटर उघडे आहे व बाहेरून दार सुध्दा बंद केलेले होते. रमेश भोयर यांनी बाहेरून लागलेले दार उघडले. फिर्यादी व त्यांची पत्नी हीने बाहेर येवुन पाहीले तर दुकानाचे सामान अस्तव्यस्त अवस्थेत व पैशाचा गल्ला बाहेर पडलेला दिसला व ड्राप सुध्दा उघडा दिसला. त्यात ठेवलेले पैसे १५,०००/–रू. तसेच काउन्टर

कॅश ९,४५०/—रू. असे दिसले नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या दुकानातील कि. २४,४५०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास श्रेणी पोउपनि देवशंकर गुप्ता मो.क्र. ९५११२४७२६१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**